ISBN NO. 978-93-85882-06-7

# SECOND UGC SPONSORED

2015-16

# Two days international/interdisciplinary conference

## "BE THE CHANGE YOU WANT TO SEE IN THE WORLD"

Mahatma Gandhi

ON

29th & 30th January 2016

GANDHI STUDY CENTER

LEARN FROM THE LEGEND

NEW ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, WARDHA - 442001

Organized by

Gandhi Study Center

New Art's Commerce & Science College,

Nalwadi, Wardha (M.S.)

330

| | | | |
|---|---|---|---|
| 62 | ASSI. PROF. MUKTESWAR DAS | GANDHIJI'S SHADOW ON ENVIRONMENTAL MOVEMENT. | 228 |
| 63 | प्रा.संजय उगेमुगे | महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसेसंबंधी विचार | 232 |
| 64 | प्रा. डॉ. मेघा सबाने | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | 234 |
| 65 | प्रा. प्रमोद तडस | महात्मा गांधीजींच्या विचारांची आवश्यकता | 237 |
| 66 | डॉ. अलका प्रदीप वालचाळे (सरोदे) | गांधी युगातील स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया | 238 |
| 67 | कु. अर्चना नारायण धर्मे | महात्मा गांधी व अहिंसा | 241 |
| 68 | प्रा. आमले बबन परसराम | महात्मा गांधी यांचे ग्रामीण विकासासंबंधीचे विचार. | 243 |
| 69 | प्रा. भिमाशंकर एम. डहाळके | महात्मा गांधी यांचेस्त्री विषयक विचार - एक अध्ययन | 245 |
| 70 | चौधरी प्रदीप विनायक | महात्मा गांधी यांचे राजकीय विचार आणि सद्य:स्थितीतील भारतीय लोकशाही | 248 |
| 71 | डॉ. सी. डी. पाखरे | महात्मा गांधींची स्त्री विषयक भूमिका | 250 |
| 72 | डॉ.संजीवन कदम | महात्मा गांधी यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन | 252 |
| 73 | डॉ.सतीशमा. चंहादे | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | 255 |
| 74 | प्रा. डॉ. विलास के भिमनवार | सत्याग्रह | 258 |
| 75 | सहाय्यक प्राध्यपक डॉ. महेन्द्र पांडुरंगजी गावंडे | महात्मा गांधी : सत्य व अहिंसा | 260 |
| 76 | डॉ. रमेश जी. सुरळकर | महात्मा गांधी आणि अहिंसा सिध्दांत | 263 |
| 77 | प्रा. काशीनाथवि. तरासे | महात्मा गांधींचे रचनात्मक कार्य | 266 |
| 78 | - डॉ.खासेराव हि. भैरव-पाटील | महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातुन मांडलेली लोकशाहीतील राष्ट्रीयत्व संदर्भातील इतिहास शास्त्रीय चिकित्सा | 270 |
| 79 | प्रा. किशोरकुमार मनोहरराव इंगळे प्रा. राजा मनोहर इंगळे | महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार | 271 |
| 80 | प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे<br>प्रा.डॉ.अशोक टिपरसे | महात्मा गांधींचा स्त्रीवादी कार्यात्मक दृष्टीकोन | 274 |
| 81 | प्रा. लक्ष्मण शा. पवार | लोकशाहीत सत्याग्रहाची भूमिका | 279 |
| 82 | प्रा.मंगला अ. कडवे | " महात्मा गांधी आणि स्त्रिया " | 281 |
| 83 | प्रा.मनोज श्रीकृष्णराव पवार | महात्मागांधीआणिग्रामिणविकास | 283 |
| 84 | प्राचार्य डॉ. मारुती शिवराम माने | नैतिक, मानसिक आणि शारिरीक आरोग्याचा उत्तम मार्ग - गांधीवादी दृष्टीकोन. | 285 |
| 85 | डॉ. अभिजीत वि. वेरुळकर | आधुनिक काळात महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाची उपयुक्तता | 287 |
| 86 | प्रा. डॉ.मिलींद भगत प्रा. मनोज सोनटक्के | माहात्मा गांधीचा भारतीय स्त्रि विषयक दुष्ट्रिकोन | 288 |
| 87 | सहा.प्रा.मोकासरे जी.टी. | महात्मा गांधी यांचे स्त्री विषयक विचार | 291 |
| 88 | डॉ पी.आर.पुंडकर | महात्मा गांधीजींची सत्याग्रह चळवळ | 292 |
| 89 | प्रा. प्रभाकर पुसदकर | गांधींचा स्त्री विषयक दृष्टिकोण आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या त्यांच्या सामाजिक, राजकीय आंदोलनातील महिलांची भूमिका, अस्मिता व अस्तित्व | 294 |
| 90 | प्रा. प्रशांत देशमुख | महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे ग्रामीण विकासाचे विचार | 299 |
| 91 | प्रा. राहुल लभाने | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सत्य व अहिंसा संदर्भातप्रकटकेलेले योगदान | 301 |
| 92 | प्रा.डॉ. उल्हासरामजीराठोड | 'महात्मा गांधी आणि असहकार आंदोलन' | 305 |
| 93 | प्रा.संजीववि. भुयार | महात्मा गांधींच्या विचारातील गोसेवा आणि निसर्गोपचार -एक चिकित्सक अध्ययन- | 308 |
| 94 | संकेत सुरेशराव काळे | सत्याग्रहाची लोकशाहीतील भूमिका | 312 |
| 95 | डॉ. सविता खोकले | सत्याग्रही गांधीजी | 315 |

ISBN NO.: 978-93-85882-06-7

१)अहिंसा या तत्वाचा वापर त्यांनी स्वांतत्र्य लढयासाठी करुन तो लढा जिंकला व या तत्वाला तथागत गौतम बुध्दानंतर पुन्हा आंतर राष्ट्रीय स्वरुप प्राप्त करुन दिले.

२)भारतीय जीवन पध्दतीत ज्या मुल्यांना महत्व आहे. ती मुल्ये गांधीनी आत्मसात करुन त्यांचा दैनंदिन जीवनात वापर केला. व इतरांना सुध्दा त्यासाठी प्रवृत्त केले.

३)देशात शांतता नांदली तर देशाचा विकास होईल. यासाठी अहिसेचा वापर करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सुची :-**

१)प्रजासत्ताक भारताची नैतक मूल्ये, डॉ. अनंत राऊत. कैलास पब्लीकेशन औरंगाबाद ऑगस्ट २००६, पान क्र. ७७,७८

२)कित्ता ८०,८१

३)आधूनिक भारतातील राजकीय वारसा :- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशीक, जुलै २००२ पान क्र. ३, ३३ ते ३५.

४)आधूनिक भारतातील राजकीय विचार भास्कर लक्ष्मण भोले. महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पूणे, ऑगस्ट १९७८ पान क्र. ३२१, ३२४, ३२६

## महात्मा गांधींचा स्त्रीवादी कार्यात्मक दृष्टीकोन

**प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमूख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ratnakarlakshete1@gamil.com
मो.नं. 09423439276 – 9028976151

**प्रा.डॉ.अशोक टिपरसे**
अर्थशास्त्र विभाग प्रमूख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ashoktiparse21@gamil.com
मो.नं. 9422580129

**"या भूतलावार हाडामासाचा असा एक माणूस होऊन गेला असे पुढील पिढ्यांना कोणी सांगितले तर त्यावर त्यांचा विश्वास बसणार नाही." ...अल्बर्ट आईनस्टाइन**

भारतात स्त्री सक्षमीकरणाची एक प्रभावी परंपरा आहे. महात्मा गांधींजी त्या परंपरेचे प्रवाही व वाटेकरी होते. महात्मा गांधी २० व्या शतकात गौतम बुध्दाच्या स्त्री चळवळीतील भिक्कू,महात्मा बसवेश्वरांच्या स्त्री सुधारणेतील शरण व शरणी, वारकरी परंपरेतील वारकरी,छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यातील मावळा आणि सत्याग्रही निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील एक धागा होते. भारतात १९ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक समाज सूधारक व सामाजिक संस्थानी महत्वपूर्ण प्रयत्न केले. पश्चिमेकडील नवजागरणाच्या प्रभावाने व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तीमत्व विकास, शिक्षण, स्त्रियांच्या सामाजिक आणि मानवी हक्काने भारतातील तत्कालीन बुध्दीवादी व मानवतावादी सुशिक्षीत वर्गाला प्रभावित केले. जंगलात राहून ईश्वरी चिंतनात रमल्याने मानवाची प्रगती होत नाही. सभोवतालच्या मानवी जीवनाची नैतिक पातळी उंचावणे व प्रतिष्ठा मिळवून,त्यांचे प्रश्न सोडवणे हाच इश्वरीय धर्म आहे. तो समाजात वास्तव्य करणाऱ्या स्त्रीया आणि पुरुषांच्या जीवनपध्दतीवर अवलंबून असतो. मानवतावादाच्या वास्तविक आशयाला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी महात्मा गौतम बुध्दापासून महात्मा गांधीजी पर्यंत अनेकांनी प्रयत्न केले. प्रत्येकाचा आशय सारखाच असून मार्ग वेगवेगळे होते. सत्य व अहिंसेवर आधारीत समतावादी चळवळीचा प्रारंभ गांधींनी केला होता. प्रस्तूत लेखाच्या मांडणीचा उद्देश महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार अभ्यासणे. त्याबाबत त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन त्याची प्रस्तूतता स्पष्ट करणे हा आहे. भारतहा स्त्री सक्षमीकरणाचा उज्वल इतिहास असणारा देश आहे. तरीही अनेक वर्षांपासून स्त्रीयांची उपेक्षा होते. स्त्रीयांना सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महात्मा गांधीनी भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग मिळवून दिला. जो पर्यंत समाजातील प्रत्येक उपक्रमात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना स्थान प्राप्त होत नाही, तोपर्यंत कोणतेही राष्ट्र प्रगतशील व सुसंस्कृत होऊ शकत नाही. असा विचार करुन महात्मा गांधीनी स्त्रीयांच्या अधिकारांचा व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महात्मा गांधी पूर्वी फुले राजाराम मोहन रॉय, इश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादीनी स्त्रीयांना सामाजिक व राजकीय अधिकार मिळवून देण्यासाठी जाणीव जागृती केली. प्रस्तूत लेखात महात्मा गांधींनी स्त्री स्वातंत्र्य,



332

स्त्री शिक्षण, स्त्री पुरुष समता, आर्थिक स्वावलंबन, स्त्री सन्मान व प्रतिष्ठा यासाठी सत्याग्रह, नई तालिम, स्वदेशी, रामराज्य, विश्वस्त संकल्पना, चरखा, अध्यात्मीक राजकारण, मानवतावाद, नैतिकता, सत्य, अहिंसा व स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग इ.चा वापर कसा केला याविषयची मांडणी करण्यात आली.

**भारतीय समाज आणि स्त्री :-** महात्मा गांधींनी विदेशात शिक्षण घेतले होते. दक्षिण अफ्रिकेतून गांधीजी भारतात परत आले. भारतीय राजकारणात सक्रीय सहभाग घेण्यापूर्वी गांधी संपूर्ण देश फिरले तेंव्हा त्यांना भारतीय समाजातील स्त्रीयांच्या परिस्थीतीची जाणीव झाली. स्त्री म्हणजे अपूर्ण पुरुष होय. मनुस्मृतीतील खालील विधानाप्रमाणे गांधींना स्त्री चित्र जाणवले. **"पिता रक्षती कौमार्ये,भर्ता रक्षती यौवने। पुत्रो रक्षती वार्धक्ये,न स्त्री स्वातंत्र्य मर्हती ।।"**

प्राचीन काळापासून भारतीय समाजात सर्व प्रकारच्या अधिकारांचा लाम अतिशुद्राशिवाय सर्वांना मिळत होता. स्त्रीयांची अवस्था पशूसमान होती. स्त्रीयांचे कार्यक्षेत्र चुल आणि मूलं होते. कुटुंबातील पुरुषांद्वारे स्त्रीयांवर होणारे अत्याचार न्याय्य समजले जात. समाजात स्त्रीयांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य आणि अधिकार नव्हते. भारतातील परंपरागत समाजात स्त्रीयांच्या दयनीय अवस्थेबद्दल महात्मा गांधींनी अत्यंत तीव्र स्वरुपात आपला निषेध नोंदविला. अशा समाजातील स्त्रीयांची प्रतिमा सुधारण्यासाठी प्रथमत: स्त्री विषयक जनजागृती व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा निर्धार केला. त्यासाठी आपल्या भारत भ्रमनातून स्त्री स्वातंत्र्यास पोषक जनजागृती घडवली. According to Gandhi -Intellectually, Mentaly and Spiritually Women is equivalent to a male and she can participate in every activity. गांधीच्या मते स्त्री आणि पुरुष ही समाज रथाची दोन समान चाके आहेत. या दोघांशिवाय समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा रथ स्थीर पणे चालू शकत नाही. महात्मा गांधींच्या मते - मला हे माहित आहे की भारतातील स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने विकास करत आहेत. काही क्षेत्रात तर त्या पुरुषांपेक्षा ही सरस ठरतांना दिसत आहेत. पण आजही पाश्चात्य राष्ट्रातील काही विचारवंताना वाटते की आजही भारतीय स्त्री रुढीपरंपरा व प्रथेच्या जोखडातून बाहेर पडलेली नाही. जोपर्यत या क्षेत्रात सुधारणा होत नाही तो पर्यंत स्त्रीयांचा दर्जा सुधारला असे म्हणने अतिशयोक्ती ठरेल. या वरील विधानाप्रमाणे गांधीनीं सतीप्रथा, बालविवाह, विधवाविवाह, देवदासी, वेश्या व्यवसाय, अस्पृश्यता, अंधश्रध्दा व स्त्री पुर्नविवाहास विरोध करणाऱ्या वरील स्वरुपाच्या अन्यायी, अत्याचारी प्रथा व परंपरांना कडाडून विरोध केला. स्त्रीयांच्या सर्वांगिण स्वातंत्र्यासाठी त्यांना सामाजिक गुलामगिरीतून कायमस्वरुपी मुक्त करावे म्हणून स्त्री शिक्षण, संतती नियमन, हूंडा पध्दतीस विरोध व स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महात्मा गांधीच्या मते स्त्री स्वातंत्र्याचा खरा प्रारंभ कुटुंब संस्थेपासूनच होतो. कुटुंबात स्त्री आणि पुरुषांना समान हक्क असावेत. मनुष्य म्हणून स्त्री आणि पुरुषांच्या गरजा समान व परस्पर पुरक आहेत. Gandhijis Idea of women as mother and mother India दोघेही एकमेंकाच्या सहकार्या शिवाय जगू शकत नाहीत. समाजातील विविध परंपरा व घटनांचा सर्वाधिक परिणाम कुटुंब संस्थेवर होतो. स्त्रीयांचा हक्क हिरावून घेण्यास येथील पुरुष प्रधान कुटुंब पध्दतीच मुळात कारणीभूत आहे.

महात्मा गांधीजींच्या मते स्त्री ही अत्यंत चंचळ, विवेकी आहे. प्रेम, दया, सहनशीलता श्रम, सहीष्णूता इत्यादी सदगूणांची खाण आहे. तरी तिला धर्मशास्त्राने व परंपरेने कुटुंबातच बंदीस्त केले. कोणताही स्वयंनिर्णयाचा अधिकार दिला नाही. भारतीय कुटुंब व्यवस्थेत समतावादी सुधारणा होत नाही तोपर्यंत स्त्रीयांना सन्मान व अधिकार मिळणार नाहीत. स्त्री पुरुषाच्या शरिरसुखासाठीची भोग वस्तू नसून वंशसातत्याचे एक नैसर्गिक सत्य आहे. Gandhis words - To call women the weaker sex is a libel, it is mans injustice to women. If by strength is meant brute strength, then, indeed, is women less brute than man. If by strength is meant moral power, than women is immeasurably mans superior. Has she not greater intation, is she not more self – sacrificing, has she not greater powers of endurance, has she not greater courage? Without her, man could not be. If nonviolence is law of our being, the future is with women. Who can make a more effective appeal to the heart than woman. स्त्री कौटुंबिक हिंसाचार, शोषण व दुबळे पणाच्या विरोधात लढा देण्यास तयार होणार नाही. तोपर्यंत आम्ही कोणत्याही स्त्री

विषयक सुधारणांचा विचार करु शकणार नाही. कारण अनादी काळापासूनच्या स्वार्थपूर्ण दृष्टीकोणाचा स्त्री बळी ठरली आहे. त्यामुळे तिचे मानसिक खच्चीकरण झाले. तत्वत: कुटुंबसंस्था ही स्त्री मुक्तीचा मार्ग मोकळा करणारी पहिली सामाजिक संस्था आहे. कौटुंबिक चौकट ओलांडून स्त्रीयांनी स्वत:च्या व समाजाच्या अध्यात्मिक व शैक्षणिक प्रगतीत, संस्कृती संवर्धनात, अर्थ व्यवस्थेच्या बांधणीत सहभाग नोंदवावा तरच राष्ट्र उन्नतीस तिचा हातभार लागू शकतो. कल्पना चावला, मेधा पाटकर, साधना आमटे, सिंधूताई सपकाळ, प्रिती झिंटा, प्रियंका चोप्रा, किरण वेदी, प्रतिभा पाटील, सरोजिणी नायडू, कल्पना दत्त, इंदिरा गांधी अशा अनेक महिलांनी स्वत:ला कौटुंबिक बंधनातून मुक्त करुन राष्ट्र हितातील व प्रगतीतील आपले योगदान सिध्द केले आहे. गांधीचे रामराज्य सत्य अहिंसा, परोपकार, सदाचार व सहिष्णूता इत्यादी मानवीय, अध्यात्मीक समतावादी समाजाचे रुप आहे. ज्यात स्त्री पुरुष संघटीत पणे विचार करतील व कौटुंबीक, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील समानता निर्माण होईल.

गांधींनी स्त्री पुरुषातील शारिरिक व नैसर्गिक भिन्नते शिवाय दुसरे कोणतेही वेगळे पणाचे कारण नाही. तरीही गांधी असे म्हणतात, स्त्रीयांना त्यांच्या शारिरिक रचनेप्रमाणे कार्य मिळाल्यास योग्य होईल. उदा. घरकामात स्त्री प्रविण आहे पुरुष नाही. घरकाम हे कार्य पुरुषांच्या इतर कार्याप्रमाणेच श्रेष्ठ आहे. उलट स्त्रीया घरातील सर्व काम करत असल्यामूळेच पुरुषांना इतर कामात वेळ मिळतो. केंव्हा केंव्हा स्त्री पुरुषांना त्याच्या कार्यालयीन कामात घरी राहून मदत करतांना आज दिसून येते. स्त्री-पुरुषांच्या संबंधावर कडक निर्बंध लादणे, विवाहानंतर स्त्री-पुरुषांनी एकत्र बसणे-उठणे, आपापसात संभाषण करण्यास अनैतिक मानणाऱ्या तत्वाविरुध्द लढा दिला. त्यांच्या मते स्त्री-पुरुषांच्या वैवाहिक जीवनावर कोणत्याही प्रकारची अनैतिक बंधने सदैव अन्यायकारक असतात. या बंधनातून मुक्त करण्यासाठी आपल्या आश्रमातील स्त्री-पुरुषांना मुक्तपणे वागण्याची मोकळिक दिली. तसेच त्यांच्या व्यक्तिगत, मानसिक, लैंगिक व सामाजिक प्रश्नांवर सहानूभूतीपुर्वक त्यांच्याशी विचारविनिमय केला. त्यांना देशसेवेची शिकवण दिली. म्हणूनच महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली लढलेल्या स्वातंत्र्य आंदोलनात अनेक स्त्रीयांनी पुरुषांची सहचारिणी म्हणून आपला सहभाग नोंदवला.स्त्री-पुरुषांची सहकारी आहे. तीची मानसिक शक्ती पुरुषांपेक्षा कमी नाही. तिला पुरुषांच्या प्रत्येक कामात सहकार्य करण्याचा अधिकार आहे. पुरुषांप्रमाणेच स्त्रीचीही तिच्या व पुरुषांच्या क्षेत्रातील सर्वोच्चता मान्य करावी. पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांनासुध्दा समान स्वातंत्र्य व अधिकार प्राप्त झाले पाहिजेत.

गांधीजींच्या मते स्त्री-पुरुषांच्या जीवनासाठी विवाह एक आवश्यक तत्व आहे. विवाह शारीरीक सुखासाठी न राहता समाज व राष्ट्रांच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी आहे. समाज व राष्ट्र सेवा करण्याचा एक संस्कार व कर्तव्य या अर्थाने विवाहाचा स्वीकार सर्वच स्त्री-पुरुषांनी करावा. विवाहोउपरांत स्त्री-पुरुषांनी परस्परांचा मान सन्मान व आदर राखावा. बालविवाह ऐवजी प्रौढ विवाहास मान्यता दिली विधवा विवाहांचे समर्थन केले. आंतर जातीय विवाहास मान्यता दिली. स्त्री गर्भाच्या हत्येचा निषेध केला. विवाहानंतर स्त्रीच्या सतीप्रथा व केशवोपणास विरोध केला.मी स्त्रीयांच्या अधिकाराबाबत कोणतीही तडजोड करण्यास तयार नाही. माझ्या मते स्त्रीयांवर कोणतेही कायदेशीर बंधन नसावे त्यांनी मुलगा आणि मुलगी यांना समान वागणूक द्यावी यांचे समर्थन केले. सध्याचे युग स्त्री-पुरुषांच्या समतेचे आहे, अशा काळात स्त्री वर्गाला अपमानास्पद होईल असा भेदभाव करणे हे काळाशी सुसंगत नाही. मुलगा जन्माला आला म्हणजे इर्षाने बेहोश व्हावे आणि मुलगी झाली म्हणजे शोक करीत बसावे, याचे कारण काही माझ्या ध्यानात येत नाही. दोन्हीही ईश्वराचीच देणगी दोघांनाही जगण्याचा सारखा हक्क आहे आणि जगाची रहाटी चालू ठेवण्यासाठी दोघांचीही सारखीच गरज आहे.

**स्त्री स्वातंत्र्य आणि शिक्षणाची अनिवार्यता :-** शिक्षणाचा गंध नसलेल्या समाजाची अवस्था पशूपेक्षा वेगळी नसते. याचा अर्थ शिक्षण मनुष्यत्वाच्या प्राप्तीची पहिली पायरी आहे. भारतामध्ये स्त्रीयांना शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. स्त्रीयांना शिक्षण देण्यासाठी फुले दांपत्यानी आपले आयुष्य खर्ची केले. मुलींची शाळा उघडली. फुल्यांच्या सुधारणावादी धोरणातून भारतातील अनेक स्त्रीया शिक्षण घेऊ लागल्या, पण हे प्रमाण मोजक्याच वर्गापुरते मर्यादित होते. शिक्षण समाजातील सर्वांना खुले असावे. शिक्षणात स्त्री-पुरुष, उच्चनिच्च, श्रेष्ठ कनिष्ठ, गरीब-श्रीमंत भेद नसावा. शिक्षण हे साध्य नसून ते एक समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणाने स्त्री चारित्र्य घडते. शिक्षण स्त्रीसह सर्व शुद्र, अस्पृश्य यांना मिळावे. गुलामगिरीतून

स्त्रीयांना मुक्त व्हायचे असेल तर स्त्रीयांनी शिक्षण घेतले पाहिजे. त्यासाठी समाजाने स्वतःहून स्त्रीयांना शिक्षण द्यावे. त्यास पोषक वातावरण निर्माण करावे. स्त्री शिक्षण व सहकार्यातून समाज विकासाची ब्ल्यू प्रिंट तयार करावी. स्त्री शिक्षणाशिवाय कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय, अध्यात्मिक व बौध्दीक दृष्ट्या सशक्त होणार नाही. स्त्री सबलीकरणाशिवाय कोणत्याही समाजाच्या विकासाची कल्पना करता येत नाही. गांधीच्या स्त्री शिक्षणाला मानवतावादी चेहरा होता. स्त्री शिक्षणाच्या माध्यमातूनच आपण महासत्ताक व चारित्र्यसंपन्न भारताचे स्वप्न पुर्ण करु. महात्मा गांधींनी नई तालीम व चरखा यांच्या माध्यमातून स्त्री-शिक्षण व आर्थिक स्वावलंबनाचा नवा पर्याय उपलब्ध केला. नई तालीम गांधीच्या विचारातील सत्याग्रही स्त्री निर्माण करण्याचे एक उत्तम माध्यम आहे.

स्त्री स्वातंत्र्यांचा पुरस्कार करतांना गांधी म्हणतात - ज्या जातीत वा देशात स्त्री जातीला मान दिला जात नाही. तो देश सुसंस्कृत नसतो. त्याग, सहनशीलता आणि धैर्य या तीनही गुणांत स्त्रिया पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ असतात, अशा स्त्रीयांना भारतात अत्यंत शुद्र वागणुक दिली जाते. हि अत्यंत निंदणीय बाब आहे. निसर्गतः पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांनाही आपले अस्तित्व निर्माण करण्याची शक्ती प्राप्त झाली. पण तिचे अस्तित्व समाजाने दडपून टाकल्यामूळे ती गुलामासारखे जीवन जगते. म्हणून स्त्रीयांना स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचे स्वातंत्र्य व संधी उपलब्ध करुन द्यावी. अशीच संधी १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी उपलब्ध करुन दिली होती. म्हणूनच ७० स्त्री शरणी कडून वचन साहित्य निर्माण करुन घेणे बसवेश्वरांना शक्य झाले. गांधीनींही असाच विचार केल्यामूळे त्यांना स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रीयांचा सहभाग व सहकार्य मिळवीता आले. भारतीय समाजात स्त्रियांचे चित्र घरकाम करणारी, पतीची एकनिष्ठ सेवा करणारी गृहिणी म्हणून रेखाटले आहे. तिला शिक्षणाचा व सदसद विवेक बुध्दीचा उपयोग व्यक्तीमत्व विकासासाठी करु दिला नाही. पतीसह व पतीशिवाय कोणतेही धर्म कृत्य करण्याचे स्वातंत्र्य समाजाने दिले नाही. बसवेश्वरांनी या प्रथेविरुध बंड पुकारुन स्त्री स्वातंत्र्याचा हुंकार भरला. गांधी म्हणतात बसवेश्वरांनी १२ व्या शतकात केलेल्या समाज सुधारणेच्या कार्यास मला पुढे चालवायचे आहे. त्यासाठी स्त्रीयांच्या सामजिक शोषण व मानसिक गुलामगिरीचा व मानहानीचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. मी सुध्दा भारतीय संस्कृती आणि धर्मशास्त्राचा आदर करतो. आत्मीयता बाळगतो. पण जी धर्मशास्त्रे, संस्कृती व परंपरा स्त्रीयांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देत नाहीत. स्त्री स्वातंत्र्याच्या आड येतात. अशांचा मानवतेच्या आधारावर विरोध केला पाहिजे. अशा अनेक प्रथा व परंपराचा विरोध करणाऱ्या कायद्यांची निर्मिती झाली आहे. भारतीय संविधानाने स्त्री स्वातंत्र्याचा आदर केला. तरीही आज बलात्कार , कौटुंबिक हिंसाचार, गर्भहत्या, शारिरिक शोषण व आर्थिक दास्यता आहेच. आपला स्वाभिमान जागवण्यासाठी न्यूनगंडाची भावना सोडून दिल्यासच स्वातंत्र्याचा उपभोग घेता येतो. गांधींजी स्त्री स्वातंत्र्याचा आग्रह करतांना म्हणतात की, समाजव्यवस्थेत कायदा व सुव्यवस्था निर्माण करतांना पुरुषांनीच पुढाकार घेवून स्त्रीयांचा स्वातंत्र्याचा अधिकार व सहभागीत्वाबाबत आपली न्यायबुध्दी व विवेकीपणा दाखविला नाही. जो विवेकी पणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोडबिलाचा आग्रह करुन दाखवला. ७३ व ७४ घटना दुरुस्तीने स्पष्ट झाला. २००५ च्या कौटुंबिक हिंसाचार कायद्याने प्रकट झाला. तसेच पुरुष ज्याप्रमाणे आपले हक्क व स्वातंत्र्य सुरक्षित ठेवतात. तसेच स्वातंत्र्य व हक्क स्त्रीयांना देण्यास का ? तयार होत नाहीत. समाजात पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांनासुध्दा शिक्षण, मालमत्ता, कौटुंबिक संपत्ती, स्वयंनिर्णयाचा, राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रातले सर्व अधिकार व स्वातंत्र्याचा उपभोग घेता आले पाहिजे.

भारताच्या सामाजिक व राजकीय इतिहासात अक्क महादेवी, सावित्री, सीता, द्रोपदी, कित्तूरची राणी चेन्नम्मा, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, जिजामाता, विरांगणा तराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले इत्यादी स्त्रीयांनी आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करुन अधिकार व स्वातंत्र्याच्या आधारे स्वतःचा प्रभाव व आदर्श समाजात निर्माण केला आहे. हाच आदर्श घेऊन स्त्रीयांना स्वातंत्र्य व अधिकार उपभोगण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. ज्याचा उल्लेख जे.एस.मीलने त्याच्या ऑन लिबर्टी या ग्रंथात केला. स्त्रीयांनीही आपल्या सामाजिक बलस्थानाचे व कर्तृत्वाचे महत्व व गांभीर्य लक्षात घेऊन स्वतःसह इतर स्त्रीयांचे स्वातंत्र्य व अधिकारांचे संरक्षण करावे. जसे आज सिंधूताई सपकाळ व युसुफजाई मलाला करतात. लोकशाही करणाच्या प्रक्रियेत संविधान, कायदा याप्रति जागरुक राहून आपल्या हक्काची चळवळ जीवंत

ठेवावी कारण वर्तमान गांधी विचार विरोधी समाज व राज्य व्यवस्थेत पुन्हा दुसरे गांधी, फुले व इतर महापुरुष जन्माला येतील याची शक्यता नाही. आलेच तर राजकीय पक्ष व मिडीया स्वत: च्या स्वार्थ पूर्तीसाठी व टिआरपी (TRP) वाढविण्यासाठी त्याची काय अवस्था करतील हे सांगता येत नाही.

आपल्या पराक्रमी आदर्शांना प्रमाण माणून भारतीय स्त्रीयांनी परंपरागत बंधनांच्या श्रृंखलातून बाहेर पडावे. भारताच्या स्वातंत्र्य अंदोलनात स्त्री सहभागी झाल्याशिवाय आम्हाला भारतीय स्वातंत्र्याचे स्वप्न पुर्ण करता येणार नाही. स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रीयांच्या सहभागाची आवश्यकता व सहकार्याची उपयुक्तता ओळखली. म्हणून गांधींनी स्त्री स्वतंत्र्याचा पुरस्कार स्वत:पुरुषांनी पुढाकार घेऊन करावा. असा उपदेश गांधीजी भारतीय समाजाला देतात. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व ब्रिटीशा विरोधात जनजागृती करण्यासाठी भारतातील सर्वच स्त्री-पुरुषांनी सहभागी व्हावे. स्त्रीयांसुध्दा पुरुषाप्रमाणेच भारताच्या नागरिक आहेत, त्यामुळे त्यांनी स्वातंत्र्य अंदोलनामध्ये सहभागी व्हावे. स्त्री सहभागीत्या शिवाय भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे अपेक्षित परिणाम घडवून येणार नाहीत. महात्मा गांधीनी स्त्री शक्तीला स्वातंत्र्य लढ्याप्रती जागृत व लोकाभिमुख वनविण्यासाठी कृती कार्यक्रम आखला. उदा.स्वदेशीचा स्वीकार, परकीय मालावर वहिष्कार. गांधीच्या या कृती कार्यक्रमाचा वैचारिक आधार साधन शुचितेप्रमाणेच सत्य व अहिंसात्मक तत्वाज्ञानावर आधारित होता. महात्मा गांधींनी स्त्रीयांना स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी करुन घेण्यासाठी परदेशी मालांना विरोध, परकीय सत्तेस असहकार व तिच्यावर वहिष्कार टाकण्याचा मार्ग अवलंवविण्याचे आव्हान केले. ज्यास प्रचंड उत्सफुर्त प्रतिसाद मिळाला. अनेक स्त्रीयांनी कौटुंविक जवावदारीतून वाहेर पडून स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. परदेशी वस्तुंची होळी व वहिष्कार, स्वदेशीचा स्वीकार, उपोषण, असहकाराच्या साह्याने सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह, वंदे मातरम, उपोषण, ग्राम स्वच्छता, दारुवंदी चले जाव चळचळ या विविध कार्यक्रमातून आपला उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. उदा. सरोजनी नायडू, प्रितिलता वाडेदार, कल्पना दत्त अशा अनेक स्त्रीयांनी नेतृत्व करुन भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व्यापक बनवले. स्त्रीयाचे जीवन स्वावलंवी व्हावे म्हणून सुतकताईचे प्रशिक्षण दिले. भारतातील अनेक स्त्रीयांनी चरख्याच्या साह्याने खादीचे वस्त्र निर्मिती व विक्रीच्या प्रक्रियेत भाग घेतला. खादीचे वस्त्र निर्मिती व सुतकताई हे कार्य स्त्रीयांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले होते. स्वत: गांधीनी आपली पत्नी कस्तूरबा यांना चरखा चालवण्यास शिकवले कस्तूरबा व गांधी स्वत: सुतकताई करुन निर्माण केलेले खादीचे कपडे वापरत आज भारतीय तरुण तरुणींनी खादीच्या वापरास प्राधान्य द्यावे ज्यामुळे रोजगार वाढतो. अनेक कुटुंबांच्या अर्थशास्त्रास मदत होते. स्वदेशी लघुउद्योगास चालना मिळते. मोठमोठ्या कारखाण्यातून निर्माण झालेल्या केमिकल युक्त तंग कपडे वापरुन होणाऱ्या आजारास टाळण्यासाठी खादी वापरावी असाच संदेश गांधीनीं दिला.

स्त्रीयांचा सुतकताई व सत्य अहिंसा विचारावरील वाढती श्रध्दा व सहभाग पाहून गांधीजींना सत्याग्रहाचे आंदोलन गतीशील करता आले. भारताला स्वराज्य मिळवण्यासाठी पुरुषांइतकाच स्त्रीयांचा सहभाग अनिवार्य आहे. ब्रिटीश शासनाने मिठावर लावलेल्या कराच्या विरोधातील दांडीयात्रेत अनेक स्त्रीयांनी सहभाग घेतला. तदनंतर गांधीजींना अटक करण्यात आली. त्यावेळी ब्रिटीश विरोधात कायदेभंगाची चळवळ व्यापक करण्याचा निर्धार कस्तुरवा गांधी व सरोजीनी नायडू यासह अनेक स्त्रीयांनी घेतला. कायदेभंगाच्या या आंदोलनासाठी अनेक स्त्रीयां घरावाहेर पडल्या. तरीही न डगमगता तुरुंगवास भोगला स्त्री ही अवला आहे हा समज नाहिसा करुन दाखविला. त्यामुळे खऱ्या अर्थाने या भारतीय स्त्रीयांच्या कर्तृत्वाला संधी मिळवून देण्यासाठी महात्मा गांधींनी प्रत्यक्ष कृतीधोरणांचा अवलंब केला. ज्याचा परिणाम स्वातंत्र्यानंतर सरोजिनी नायडू भारताच्या पहिल्या स्त्री राज्यपाल तर विजया लक्ष्मी पंडीत आम सभेच्या अध्यक्ष बनल्या गांधीजींच्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचारास नैतिक अधिष्ठान होते. या नैतिक अधिष्ठानामुळेच स्त्रीयांच्या समान अधिकार आणि स्वातंत्र्याला कोणीही विरोध केला नाही. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागातून स्त्रीयांनी सामाजिक-राजकीय-आर्थिक क्षेत्रातील अमानवीय मुल्यांना तिलांजली दिली. खादीचे उत्पादन व त्याचा प्रसार, स्वदेशीचा वापर, परदेशी वस्तूंचा बहिष्कारावावत जनजागृती व लोकमत तयार करण्यात महत्वाची भुमिका बजावली. सत्य व अहिंसेवर आधारित समाजास प्राधान्य दिल्याशिवाय स्वातंत्र्य आंदोलनाचा पाया मजबूत होणार नाही. या गांधींजींच्या विचाराने प्रेरीत होवून .इंदिरा गांधी, विजयालक्ष्मी



336